सत्यमेव जयते

# १३ वी महाराष्ट्र विधानसभा
# २०१४
# सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय



महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१६

**फडणवीस, श्री. देवेंद्र गंगाधरराव**



| | | |
|---|---|---|
| **जन्म** | : | २२ जुलै १९७०. |
| **जन्म ठिकाण** | : | नागपूर. |
| **शिक्षण** | : | एलएल.बी. (नागपूर विद्यापीठ तृतीय मेरिट), एम.बी.ए., डिप्लोमा इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट, डी.एस.ई. बर्लिन, जर्मनी येथून उत्तीर्ण. |
| **ज्ञात भाषा** | : | मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : | विवाहित, पत्नी श्रीमती अमृता. |
| **अपत्ये** | : | एकूण १ (एक मुलगी). |
| **पक्ष** | : | भारतीय जनता पक्ष. |
| **मतदारसंघ** | : | ५२-नागपूर दक्षिण-पश्चिम, जिल्हा नागपूर. |
| **इतर माहिती** | : | कार्यकारी सदस्य, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी (युनायटेड नेशन्स द्वारा मान्यताप्राप्त संस्था); उपाध्यक्ष, दि. सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी, नाशिक (भोसला मिलिटरी स्कूल); उपाध्यक्ष, राष्ट्रीय अपंग कल्याण संस्था; |

अध्यक्ष, नागपूर जिल्हा बास्केट बॉल संघटना; १९८७ पासून सामाजिक कार्याला सुरुवात; अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य; राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, विविध उपक्रमात सहभाग; १९८९ वॉर्ड अध्यक्ष, भारतीय जनता पक्ष, धरमपेठ वॉर्ड, नागपूर; १९९० प्रसिद्धी प्रमुख, भाजप नागपूर (पश्चिम); १९९२-९५ अध्यक्ष, भाजप युवा मोर्चा नागपूर शहर; १९[illegible] २००४ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता युवा मोर्चा; २००४-२००९, २००९-२०१४ राष्ट्रीय उपाध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा; २००९ भाजप विदर्भ निवडणूक प्रमुख, १९९२ व १९९७ नागपूर मनपा सदस्य, १९९७ महापौर, महानगरपालिका, नागपूर; १९९८ मेअर इन कौन्सिल पद्धतीअंतर्गत महाराष्ट्रातील प्रथम महापौर म्हणून निवड; १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, विधानमंडळ नियम समिती, सार्वजनिक उपक्रम समिती, विनंती अर्ज समिती, गृहनिर्माण व नगरविकास स्थायी समिती, सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण समिती; सदस्य, कार्यकारी परिषद डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ; ओ.बी.सी. नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची उत्पन्न मर्यादा वाढविण्यासाठी विशेष व यशस्वी प्रयत्न; राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्या वतीने सन २००३ या वर्षाचा महाराष्ट्र विधानसभेतील **"उत्कृष्ट संसदपटू"** पुरस्कार प्राप्त; **'उत्कृष्ट वक्ता'** म्हणून राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त; रोटरी क्लबचा **"मोस्ट चॅलेंजिंग युथ अॅवार्ड"** प्राप्त; हिंदू लॉ विषयात नागपूर विद्यापीठाचा **"बी.के.बोस**

**ॲवॉर्ड**" प्राप्त; प्रमोदजी महाजन यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा मुक्तचंद पुणे या संस्थेतर्फे **उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार**, प्रकाश जोशी यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या "**राजयोगी नेता**" पुरस्काराने सन्मानीत; राज्य व राष्ट्रीय स्तरावरील अनेक पुरस्कारांनी सन्मानीत; यशदा पुणे येथे अर्बन फायनान्सिंग विषयावर व्याख्याने दिली; ऑक्टोबर, २०१४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; ३१ ऑक्टोबर, २०१४ पासून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री.

**परदेश प्रवास** : होनुलूलू येथे आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषदेत सहभाग; अमेरिका येथील "नॅशनल कौन्सिल ऑफ स्टेट लेजिस्लेचर" परिषदेत निमंत्रित व सहभागी; स्वित्झरलँड येथील डाव्होस मध्ये युनेस्को द्वारा आयोजित आपत्ती व्यवस्थापन परिषदेत "डिझास्टर मिटिगेशन अँड मॅनेजमेंट इन इंडिया" हे प्रेझेंटेशन सादर केले; चीन येथील बिजिंगमध्ये ग्लोबल इन्वायरटमेंटल चेंज काँग्रेस मध्ये 'नॅचरल डिझॉस्टर्स मिटिगेशन इशुज ऑन इकॉलॉजिकल अँड सोशल रिस्क" हे प्रेझेंटेशन सादर केले; डेन्मार्क मधील कॉपेन हेगन येथे "ॲसेम" द्वारा आयोजित मिटींग ऑफ यंग पॉलिटिकल लिडर्स फ्रॅाम एशिया अॅड युरोप यामध्ये सहभागी; अमेरिकेतील इस्ट-वेस्ट सेंटर द्वारा आयोजित न्यू जनरेशन सेमिनार मध्ये "एनर्जी सेक्युरिटी इश्युज इन इंडिया" हे प्रेझेंटेशन सादर केले; राष्टकुल संसदीय मंडळाच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळात ऑस्ट्रेलिया, न्युझिलॅड व सिंगापूर इत्यादी देशातील विविध विधिमंडळांचा अभ्यास दौरा.

**लेखन व प्रकाशन** : विधानमंडळ सदस्यांना अर्थसंकल्प समजून घेणे सुलभ व्हावे यासाठी उपयुक्त असणारे पुस्तक "अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय, २००५" या पुस्तकाचे लेखन व प्रकाशन, २०१० मध्ये या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन.

**छंद** : वाचन, संगीत (हिंदी सिनेमातील गाणी ऐकणे), क्रिकेट व कविता लेखन.

**पत्ता** : (१) २७६, त्रिकोणी पार्क, धरमपेठ,
नागपूर ४४० ०१०.
दूरध्वनी : निवास व कार्यालय ०७१२-२५३३४४६
मोबाईल : ९३७३१०७८८१.
ई-मेल : officeofmla@gmail.com

(२) " वर्षा " मलबार हिल, वाळकेश्वर, मुंबई,
दूरध्वनी (०२२) २३६३ ४९५०,
२३६३ ०४०८.

(३) मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
दूरध्वनी (०२२) २२०२ ५१५१, २२०२ ५२२२.
फॅक्स २२०२ ९२१४.